# - कालिदासाचे प्रेमविषयक तत्त्वज्ञान -

## कालिदासाचे प्रेमविषयक तत्त्वज्ञान

प्रेम हा मानवी जीवनाचा स्थायीभाव आहे. प्रियकर - प्रेयसी यांचे प्रेम, पती-पत्नींचे प्रेम, माता-पित्यांचे आपल्या अपत्यावरील प्रेम, भावाबहिणींचे प्रेम, भावाभावांचे, बहिणीबहिणींचे प्रेम, मानवाचे निसर्गावर असणारे प्रेम, आणि निसर्गातील पशु-पक्षी, प्राणी इ. चे एकमेकांवर असणारे प्रेम. या प्रेमाच्या विविध छटांचा विचार करतां आपल्याला असे दिसून येईल की, जीवन हे प्रेममय आहे. किंबहुना प्रेम आहे म्हणूनच मानवी जीवन सुसह्य आहे. या प्रेमाच्या आधारावरच मनुष्य जीवन जगत असतो, आणि समर्थपणे अनेक संकटांना तोंड देत असतो. ख-या प्रेमात एवढी ताकद आहे. विश्वास आहे. म्हणूनच गोविंदाग्रज म्हणतात, -

" क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा "

प्रेम ही नैसर्गिक भावना भूतमात्रांबरोबर जन्माला येते, आणि त्याच्या मरणाबरोबरच संपते. फक्त मानवांतच नव्हे तर मानवेतर सृष्टीमध्ये सुध्दां ही भावना प्रकर्षाने आपल्याला दिसून येते. भूतमात्रांचे जीवन व्यापून टाकणारी ही भावना परमेश्वराची अलौकिक देणगी आहे, आणि सृष्टीच्या उत्पत्तीपासून अंतापर्यंत तिचा महिमा असाच कायम राहणार आहे.

प्रेमाचे हे माहात्म्य कालिदासानेही ओळखले होते. त्यामुळे त्याच्या बहुतेक सर्व ग्रंथांचा आत्मा "प्रेम" हा आहे. प्रेम या भावनेचे वेगवेगळ्या नात्याप्रमाणे वेगवेगळे अर्थ होतात. उदा. वात्सल्य, माया, दया, भक्ति इ. परंतु मुख्यत: प्रियकर आणि प्रेयसी किंवा पती आणि पत्नी यांच्यामधील परस्पराकर्षणाला प्रेम म्हणतात. शारीरिक शृंगारातून निर्माण झालेले हे प्रेम पती - पत्नींच्या मनोमीलनानंतर अपत्यजन्मात परिणत होते आणि वात्सल्याचे उदात्त रूप धारण करते. प्रेमाच्या या सर्वच छटांचा विचार कालिदासाने आपल्या ग्रंथात केलेला असला तरी प्रियकर-प्रेयसी किंवा पती-पत्नी यांच्याच प्रेमामध्ये कवि जास्त गुंतून पडलेला दिसतो. कारण त्याचा "रघुवंश" हा ग्रंथ वगळता

बाकी सर्व ग्रंथात "शृंगार" हाच रस प्रधान आहे. या शृंगारांच्या विविध छटांचे वर्णन त्याने आपल्या ग्रंथात केलेले आढळते.

मालविकाग्निमित्रम्, विक्रमोर्वशीयम् आणि अभिज्ञानशाकुंतलम् ही तीनही नाटके प्रेमाधारित आहेत. या तीनही नाटकांचा साकल्याने विचार करता एक गोष्ट आपल्याला दिसून येते, ती म्हणजे प्रेम ही भावना अशी आहे की जी जात- धर्म, श्रेष्ठ- कनिष्ठ भाव जाणत नाही. ती एकदा सर्वार्थाने एखाद्या व्यक्तीवर जडली की मग सर्वस्वाचा त्याग करायला तयार होते, स्वसुखावर पाणी सोडायला तयार होते. मालविका, उर्वशी आणि शकुंतला या खरे पाहतां भिन्न थरातील स्त्रिया आहेत. मालविका ही खरी राजकन्या पण दुर्दैवामुळे दास्य प्राप्त झालेली, उर्वशी ही देवाङ्गना, तर शकुंतला ही अल्लड निसर्गकन्या, पण या तिघींच्याही प्रेमभावनेत अंतर नाही. आपल्या प्रियकरांवरील त्यांचे प्रेम सारखेच उत्कट आहे. अग्निमित्रासाठी, त्याच्या प्राप्तीसाठी झुरणारी मालविका, पुरूरव्यावरील निरातिशय प्रेमामुळेच आपल्या अपत्यस्नेहभावनेचा त्याग करुन मुलाला दूर ठेवणारी देवाङ्गना उर्वशी, आणि दुरुत्तरे करून पतीने दूर लोटलेली साध्वी शकुंतला या तिघींचेही प्रेम हे निःस्वार्थी आणि त्यागाधिष्ठित आहे.

या नाटकांच्या या तीनही नायिकांच्यावरून कवीला एक गोष्ट स्पष्ट करावयाची आहे की, खरे प्रेम मग ते मानवी असो वा अमानवी, त्यामध्ये सर्वस्वाचा त्याग करण्याची उदात्त भावना असते. अनंत कष्ट सोसण्याची ताकद असते, उर्वशी ही खरे पाहता अप्सरा, पण तिच्या पुरुरव्यावरील प्रेमांत आणि मालविका किंवा शकुंतला यांच्या आपल्या प्रियकरांवरील प्रेमांत कोणतेही अंतर नाही. त्या तिघींचेही प्रेम खरे आणि उत्कट आहे. खरे प्रेम हे परिणामांचा विचार करीत नाही. यामध्ये आपण यशस्वी होऊ, की अयशस्वी याचीही पर्वा करीत नाही. प्रेमामध्ये व्यक्ती सारासार विवेक गमावते. म्हणून यक्ष म्हणतो की "कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु" मेघदूत - पूर्वमेघ. ५ ती फक्त प्रेमातला आनंद त्या क्षणी घेऊ इच्छिते. त्यापायी ती मोठमोठया चुकाही करते.

उदा. उर्वशीने पती प्रेमासाठी मुलाचा त्याग केला, तर शकुंतलेने विवाहापूर्वीच दुष्यन्ताला फारसा विचार न करतां सर्वस्व वाहिले. अर्थात त्याचे भयंकर परिणामही तीला भोगावे लागले. म्हणूनच शकुंतलेच्या रुपाने कालिदासाने सर्व प्रेमिकांना एक सल्ला दिला आहे की

" अतः परीक्ष्यं कर्तव्यं विशेषात्संगतं रहः ।

अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदम् ।। अभि. शां ५/२४

म्हणजे प्रेम करावयाचे असेल आणि विशेषतः चोरटे प्रेम करावयाचे असेल तर चांगला विचार करुन मगच ते करावे. ज्यांच्या हृदयाची पारख झालेली नाही अशा व्यक्तींच्या प्रेमाचे वैरात रुपान्तर होते.

कालिदासाने शार्ङ्गरवाच्या द्वारे दिलेली ही सूचना उतावळेपणाने प्रेम करणाऱ्या सर्वच प्रेमिकांनी खरोखर लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अन्यथा अशा मुलींना शकुंतलेसारखी मानहानी सोसावी लागते.

कालिदासाच्या मते प्रेम हे एकतर्फी नसावे, ते प्रियकर आणि प्रेयसी या दोघांच्याही मनांत तितकेच उत्कट असले पाहिजे. शकुंतलेच्या बाबतीत म्हणावयाचे झाल्यास शकुंतले इतकेच दुष्यन्त राजाचे प्रेमही तिच्यावर होते. पण केवळ दुर्दैवामुळे दुर्वासांच्या शापामुळे दुष्यन्ताला शकुंतलेचा विसर पडला, आणि नाटकाच्या शेवटी पश्चात्तापदग्ध राजाने तिची क्षमाही मागितली. त्यामुळे त्या दोघांच्या प्रेमांत उणेपणा नाही. पुरुरवा-उर्वशी यांच्याही प्रेमामध्ये कोणत्याही प्रकारे कमतरता नाही. उर्वशी ही अप्सरा असूनही तिचे पुरुरव्यावरील प्रेम मानवी प्रेमास लाजविणारे आहे. त्याच्यासाठी तिने स्वर्गाचा व प्रसंगी मुलाचाही त्याग केलेला आहे. मालविका व अग्निमित्र यांच्याही एकमेकांवरील प्रेमामध्ये कोणतीही न्यूनता नाही. पण अग्निमित्र हा कालिदासाच्या इतर सर्व नायकांच्यापेक्षा परावलंबी आहे. [Active नाही] त्यामुळे प्रेमसाफल्या-साठी तो आपल्या कामतन्त्रसचिवावर अवलंबून आहे. त्यामुळे मालविकेचे आपल्यावर खरे प्रेम आहे किंवा नाही याबद्दल त्याचे मन साशंक आहे. अग्निमित्र खरे पाहता राजा आहे व मालविका ही धारिणीची आश्रित. त्यामुळे बळजबरीने

तो तिच्याशी विवाहही करू शकला असता, पण प्रेमामध्ये ही जबरदस्ती कालिदासाला पसंत नाही. कारण प्रेम हे अंत:करणापासून असेल तरच ते टिकते. जबरदस्तीने मिळवलेले प्रेम हे क्षणिक असते. शारीरिक मीलनापेक्षा दोन मनांच्या मीलनालाच कालिदास जास्त किंमत देतो. आपला हा विचार त्याने पुढील श्लोकांत व्यक्त केला आहे.

अनातुरोत्कण्ठितयो: प्रसिध्यता
समागमेनापि रतिर्न मां प्रति
परस्परप्राप्तिनिराशयोर्वरं
शरीरनाशोऽपि समानुरागयो: ।। मालविका. ३/१५. [अग्निमित्र]

उदासीन आणि अनुत्कंठित अशा दोघांच्या साध्य होत असलेल्या मीलनाने देखील मला आनंद होणार नाही. परस्परांच्या प्राप्तीविषयीं निराश झालेल्या परन्तु सारखे प्रेम करणाऱ्यांचा [दोघांचा] देहनाश देखील त्यापेक्षा बरा.

"प्रेमाचे साफल्य हे प्रेमिकांच्या स्थूल मीलनामध्ये नसून परस्परांवरील समान अशा उत्कट प्रेमामध्ये आहे" हे "प्रेमाचे तत्त्व"च कालिदासाने अग्निमित्राच्या मुखाने सर्वांना सांगितले आहे. याच अर्थाचा आणखी एक श्लोकार्ध अभिज्ञानशाकुन्तलांत आलेला आहे, तो असा -

अकृतार्थेऽपि मनसिजे रतिमुभयप्रार्थना कुरुते ।।

अभिज्ञान. शा. २/१ - दुष्यन्त आणि शकुन्तला यांच्या पहिल्याच भेटीत, परत जातांना पायांत काटा रुतल्याच्या निमित्ताने आणि कोरांटीच्या फांदीत वल्कल गुंतल्याच्या निमित्ताने शकुन्तला दुष्यन्ताकडे जो प्रेमकटाक्ष टाकते, त्यामुळे तिचे आपल्यावरील प्रीतिबद्दलचे त्याचे साशंक मन शांत होते. आणि प्रेमाचे हे तत्त्वज्ञानच तो वरील श्लोकार्धात सांगतो. तो म्हणतो - प्रेमाचे साफल्य झाले नाही तरी प्रेमिकांचे परस्परांवरील प्रेम सुखकारक होते.

या २ श्लोकांवरून कालिदासाला एक गोष्ट स्पष्ट करावयाची आहे ती म्हणजे, "प्रेमामध्ये प्रेमिकांना आवडते ती हृदयांनी हृदयाला दिलेली साद, मनाने मनाला दिलेला प्रतिसाद. वरकरणी ढोंगीपणाने केलेले प्रेम हे स्वाभिमानी

मनाला मुळीच रुचत नाही. मग ती स्त्री असो वा पुरुष. इरावती, धारिणी, औशीनरी या अशाच प्रेमामध्ये प्रतारणा झालेल्या स्त्रिया आहेत. यांच्या पतीनी त्यांच्याशी प्रतारणा केल्यानंतर अपमानित झालेल्या यांच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त होतात.

अपराधी नामाहं
प्रसीद रम्भोरु विरम संरम्भात् ।
सेव्यो जनश्च कुपित:
कथं नु दासो निरपराध: ।। विक्रमो. २ /२०

मी तुझा अपराधी आहे, आपला राग शांत कर. आणि माझ्यावर प्रसन्न हो. जिची सेवा करावयाची ती व्यक्ति जर रागावली तर दासाचा अपराध नाही असे कसे होईल ? असे म्हणून उर्वशीवर प्रेम बसलेला राजा पुरूरवा वरकरणी औशीनरी राणीच्या पायाही पडतो. पण या बेगडी प्रेमाला बळी न पडता राणी त्याचा अव्हेर करून दूर निघून जाते.

मालविकाग्निमित्रम् नाटकांतही राजाचे परस्त्रीवर म्हणजे मालविकेवर बसलेले प्रेम पाहून त्याच्या प्रथम पत्नी धारिणी आणि इरावती अशाच जळफळतात, चिडतात, संतापतात. आपल्या हातून निसटलेले प्रेम परत मिळावे म्हणून त्या मालविकेला त्रासही देतात. उर्वशीही आपल्या पतीने परकन्येकडे टक लावून पाहिले म्हणून त्याला सोडून निघून जाते. थोडक्यांत प्रेमामध्ये प्रतारणा, विश्वासघात किंवा फसवणूक कोणतीही व्यक्ती सहन करु शकत नाही. आणि अशा वेळी केलेला खोटा अनुनय तर तिला मुळीच आवडत नाही. म्हणूनच औशीनरी राणी निघून गेल्यावर राजा विदूषकाला म्हणतो -

प्रियवचनकृतोऽपि योषितां दयितजनानुनयो रसादृते ।
प्रविशति हृदयं न तद्विदां मणिरिव कृत्रिमरागयोजित: ।।

विक्रमो. २/२१. - म्हणजे मनांमध्ये प्रेम नसतांना प्रिय व्यक्तीकडून केली गेलेली प्रार्थना कामिनींच्या चित्तांमध्ये तशा प्रकारे स्थान मिळवू शकत नाही, ज्याप्रमाणे कृत्रिम रंगाने रंगविलेला मणी त्या रत्नपारखींच्या मनांमध्ये उतरत नाही."

यावेळी अशी व्यक्ती प्रेमभंगाचे दु:ख एकवेळ कसेतरी पचवेल पण त्या व्यक्तीबरोबर केलेले प्रेमाचे नाटक ती कशी सहन करु शकेल ? हां एक गोष्ट मात्र खरी की या स्त्रियांचा सात्त्विक संताप हा त्यांच्या आपल्या पतीवरील अत्यंतिक प्रेमामुळेच असतो. आणि त्यामुळे हा प्रेमभंगाचा धक्का त्या सहन करुं शकत नाहीत. त्यामुळे त्यांची प्राथमिक प्रतिक्रिया म्हणून प्रथम त्या पतीवर चिडतात, संतापतात. त्याने आपल्या केलेल्या स्तुतीला भुलत नाहीत. पण अखेर त्यांचा हा संताप किती काळ टिकतो ? कांही क्षणच. क्षणांतच त्यांना आपल्या कृतीची लाज वाटते. ख-या निरपेक्ष प्रेमाचीही ही एक बाजू मांडायला कालिदास विसरला नाही. तो म्हणतो की -

> अवधूतप्रणिपाता: पश्चात्संतप्यमानमनसोऽपि ।
> निभृतैर्व्यपत्रपन्ते दयितानुनयैर्मनस्विन्य: ।। [विक्रमो. ३/५]

म्हणजे "प्रियतमाद्वारा केलेल्या प्रणाम इ. या अव्हेर करणा-या मानी स्त्रिया नंतर दु:खी होतात व एकान्तात प्रियतमानी केलेला अनुनय - विनय आठवून लज्जित होतात". पुरुरवाने केलेली विनवणी झिडकारुन निघून गेलेली औशीनरी राणी जेव्हां "प्रियानुप्रसादन" व्रताच्या साहाय्याने राजाला प्रसन्न करुं पाहते, तेव्हा विदूषकाजवळ याची प्रतिक्रिया व्यक्त करणा-या राजाने पतिव्रता स्त्रियांचे विचारी मनच याठिकाणी उलगडून दाखविले आहे. विचारी व्यक्तीचा संताप हा कांही काळापुरताच असतो आणि विशेषत: पतिव्रता स्त्रियांचा हा संताप तर कांही क्षणातच विरतो हेच कालिदासाला येथे स्पष्ट करायचे आहे. त्यांच्या या संतापाचे कारण म्हणजे

> दुरारुढ: खलु प्रणयोऽसहन: । [विक्रमो. ४/ प्रवेशक]

"खूप गाढ असलेले दाम्पत्य प्रेम कोण्या तिस-या व्यक्तीच्या उपस्थितीच्या बाबतीत असहिष्णु - अनुदार असते." यामुळे धारिणी असो, इरावती असो, औशीनरी असो वा उर्वशी असो, झालेल्या प्रेमभंगामुळे त्यांचा सात्त्विक संताप उफाळून येतो. पण तो क्षणभरच.आपल्या उतावळेपणाची नंतर त्यांची त्यांनाच लाज वाटते.

ख-या प्रेमाला कोणत्याही गोष्टीची अपेक्षा नसते. घर, बंगला, गाडी, संपत्ती, ऐषआराम या सर्व गोष्टी ते तुच्छ मानते. त्याला अपेक्षा असते फक्त निर्व्याज, निरपेक्ष प्रेमाची. म्हणून कालिदास म्हणतो -

अनुरागोऽनुरागेण परीक्षितव्य इति सुजनवचनं प्रमाणी कुरु ।
[ मालविका. ३] म्हणजे प्रेमाची परीक्षा ही प्रेमानेच होते. ते प्रेमच जर मनापासून नसेल तर अशा खोटया प्रेमाचा काय उपयोग ? -

कालिदासाच्या ग्रंथात जागोजागी सापडणा-या यासारख्या उक्तीतून कालिदासाने जणू प्रेमाचे तत्त्वज्ञानच मांडलेले आहे. कोणत्याही गोष्टीचा सखोल विचार करणे आणि त्यातून सत्याचा शोध घेणे हा कवीचा स्वभाव यातून प्रतीत होतो, आणि या विचारमंथनातून त्याला प्राप्त झालेली सत्ये वेगवेगळया उक्तींच्या द्वारा, तो व्यक्त करतो. त्याची ही सत्यशोधक वृत्तीच त्याच्या हजारो वर्षांच्या लोकप्रियतेचे कारण आहे.

कालिदासाच्या मते स्त्रीपुरुषांच्या परस्पराकर्षणांत आणि प्रेमांत शारीर भाग असतोच, आणि शरीराच्या शक्ति कायम असेतो, उतारवयापर्यंत प्रेमातील शरीरसुखाचा हा भाग कायम राहणारच. या आकर्षणाचे प्रत्यन्तर निसर्गाच्या सर्व व्यवहारांत लता, वृक्ष, पशु, पक्षी, कीटकादि सृष्टी यांच्या जीवनांत प्रत्यही येत असते. कालिदासाने ही स्वाभाविक, नैसर्गिक गोष्ट ओळखली होती. माणसाला जो विवेक आहे त्याने त्याला आसक्तिपासून-अतिरेकापासून दूर ठेवावे येवढीच धर्माची पण अपेक्षा आहे. ज्या रघुवंशातील राजांचा आदर्श कालिदासाने मनोमन स्वीकारला तो कालिदास तारुण्यातील कामोपभोगाला पाप म्हणून, हीन म्हणून मानेल तरी कसा ? जे स्वाभाविक आहे ते तुच्छ कसे ? जगातल्या प्रत्येक तरुणीने अथवा तरुणाने शंकराचार्य किंवा ज्ञानेश्वर व्हावे असे सांगणा-या कलावंताला जीवनच कळले नाही असे म्हणावे लागेल.

कालिदासाच्या वाङ्मयात स्त्रीपुरुषांच्या शरीरमीलनाचा कुठेही निषेध नाही. मोक्षप्राप्तीसाठी तरुण वयातच शरीर-सुखातून विदेह मुक्ती

घेतली पाहिजे असा विचार नाही. - [संस्कृत नाटके आणि नाटककार - डॉ. गोविन्द केशव भट. प्रकरण - अभिज्ञान शाकुन्तल]

पण याही पुढे जाऊन कालिदासाला आणखी कांही सांगावयाचे आहे. ते म्हणजे शारीरिक मीलन हा शृंगाराचा पहिला टप्पा असला, तरी दोन जीवांच्या मनाचे मीलन हा त्यातील अंतिम टप्पा आहे. आणि हे मनोमीलन हेच त्याच्या मते आदर्श प्रेम होय. या मीलनामध्ये विलक्षण [ताकद] सामर्थ्य आहे, जे प्रेमिकांना असंख्य अडचणींमध्ये सुध्दा अविचल ठेवते आणि एकमेकाबद्दलचा विश्वास वाढविते. या संदर्भातच डॉ. गो.के. भट आपल्या "संस्कृत नाटके व नाटककार" या पुस्तकांत म्हणतात - "निरवालस प्रीतीचा आधार परस्पर विश्वास हाच आहे. तो असला म्हणजे जीवनातल्या कोणत्याही संकटांना आणि दुःखाना सामोरे जाण्याची शक्ति माणसांना येते. प्रीतीचे हे सामर्थ्य आहे. जीवनातल्या ताटातुटी, विरह हे विलक्षण यातनामय असतात, यात शंकाच नाही. पण त्यातच परस्परांमधील विश्वासाची आणि प्रीतीची कसोटी लागते, आणि दुरावलेले प्रेमिक, पतीपत्नी, व्यापक जाणिवेने अधिक समजुतदारपणे आणि औदार्याने परस्परांच्या अधिक जवळ येतात. शरीरानेच नव्हे तर मनाने, हृदयाने जीवनातल्या प्रीतीचे हे "अद्वैत" हे "भद्र" एखाद्याच सुमानुषाच्या अनुभूतीला येते. प्रीतीचे हे खोल रंग "शाकुन्तल" मध्ये कालिदासाने आपल्यापुढे ठेविले आहेत. प्रीतीच्या सखोल, विशाल भावनेची व्यापक जाणीव कालिदासाने या नाटकांत दिली आहे. ही प्रीतीची आणि कालिदासाच्या कलेची महती आहे." [नक्लेखन मार्च १९८०].

"विक्रमोर्वशीयम्" नाटकांमध्येही उर्वशी आणि पुरुरवा या दोघांना कालिदासाने विरहाच्या यातना सोसावयास लावल्या ते एवढ्यासाठीच. विरहाच्या अग्नीमध्ये दोघेही तावून सुलाखून निघाल्यानंतर त्यांचे जे मीलन होते ते मीलन शाश्वत आहे, एकमेकांबद्दलचा विश्वास व्यक्त करणारे आहे. म्हणूनच ते आदर्श आहे. यानंतर नाटकाच्या शेवटी उर्वशी आपल्याला सोडून स्वर्गात जाणार हे

दु:ख सुध्दा पुरुरवा धीरगंभीरपणे सहन करतो ते अशा विवेकी प्रेमाच्या आधारावरच.

"अभिज्ञान शाकुन्तला"मध्येही दुष्यन्त - शकुन्तलेला परस्परांच्या विरहाच्या दीर्घ यातना सहन कराव्या लागतात. यामुळे त्या दोघांच्यामध्ये जी अतूट प्रीति निर्माण होते, त्या प्रीतीला परस्परांच्या मीलनाचीही आवश्यकता नाही. कोणत्याही परिस्थितीत ती प्रीति अभंगच आहे. म्हणून शेवटी त्यांचे झालेले मीलन स्वर्गीय आणि अलौकिक आहे.

यामुळे "विक्रमोर्वशीयम्" आणि "अभिज्ञानशाकुंतलम्" या दोन नाटकाच्या पूर्वार्धामधून नाही तर उत्तरार्धामधून कालिदासांना प्रीतीचे तत्त्वज्ञान मांडावयाचे आहे.

आपल्या ह्या तत्त्वज्ञानामधून कवीला हे सांगावयाचे आहे की, प्रेमामध्ये विश्वास पाहिजे. कारण विश्वासाच्या भक्कम पायावरच प्रेमाची इमारत उभी राहते. आणि हा विश्वास एकदा का उडाला की प्रेमाची ठिसूळ इमारत कोलमडून पडते. औशीनरी राणी आणि धारिणी यांच्या प्रेमाला अशा प्रकारे धक्का बसल्यामुळेच प्रथम प्रेमाची जागा संतापाने आणि नंतर दु:खाने घेतली. पण केवळ त्या विवेकी असल्यामुळे, त्यांचे आपल्या पतीवर निरतिशय आणि निर्व्याज प्रेम असल्यामुळेच त्यांनी स्वत: अपमान पत्करुन, हार मानून पतीच्या सुखांत सुख मानले आणि प्रेमभंगाचे दु:ख पचविले. राणी इरावती मात्र सूडभावनेने पेटलेलीच दाखविली आहे. म्हणजे या तिघींच्या प्रतिक्रिया भिन्न भिन्न पण समदु:खातून त्या निर्माण झालेल्या आहेत.

या उलट शकुन्तला, सीता यांना आपल्या प्रेमाबद्दल विश्वास आहे. कारण त्यांचे प्रेम हे निरपेक्ष आहे. यामुळेच रघुवंशामध्ये [सर्ग १४] रामाने त्याग केल्यानंतरही सीता रामाच्या आपल्यावरील प्रेमाबद्दल शंका व्यक्त करत नाही. तर स्वत:च्या नशिबालाच दोष देते, बोल लावते. आणि पार्वती या आपल्या सौंदर्याचा अभिमान सोडून तपश्चर्येने शंकराला जिंकू पाहते. यक्षपत्नीपासून

दुरावलेला यक्ष आपल्या पत्नीने विरहामुळे प्राणत्याग करूं नये म्हणून तिला मेघामार्फत संदेश पाठवतो. म्हणजे एकमेकांवरील गाढ विश्वासामुळेच अनेक संकटामध्येही हे प्रेमी जीव एकमेकांना विसरत नाहीत, किंवा एकमेकांशी प्रतारणा करीत नाहीत, उलट त्यांचा एकमेकांवरील विश्वास आणि ओढ ही या विरहामुळे वाढत जाते. आपले हे प्रेमाचे तत्त्वज्ञान कालिदास पुढील उक्तीतून स्पष्ट करतो -

स्नेहानाहु: किमपि विरहे ध्वंसिनस्ते त्वभोगा:
दिष्टे वस्तुन्युपचितरसा: प्रेमराशी भवन्ति ।। मेघ. उत्तर. ४९.

विरह झाला असतां स्नेहसम्बन्ध नष्ट होतात असे म्हणतात ते निराधार - अविचाराचे आहे. उलट इच्छित वस्तूचे बाबतीत उपभोग न घेतल्यामुळे ते स्नेहसम्बन्ध जबर किंवा उत्कट होऊन त्यांची जणु प्रेमाची रास होते.

प्रेम ही भावनाच अशी आहे की ती एकदा उत्पन्न झाली की तिला अडवणे अवघड असते. तिच्या मध्ये जात - धर्म, श्रेष्ठ- कनिष्ठ, सुंदर- कुरुप इ. विकार नसतात. हिच्यामध्ये धाडस आहे, सामर्थ्य आहे. हे प्रेम माणसाला हुशारी शिकविते. चतुराई शिकवते. पंचतंत्रात एखाद्या भावनेने व्याकुळ झालेल्या व्यक्तीच्या बाबतीत एक श्लोक दिलेला आहे तो [श्लोक] या प्रेमिकांना तंतोतंत लागू पडणारा आहे. तो श्लोक असा

सत्यं परित्यजति मुञ्चति बन्धुवर्ग:
शीघ्रं विहाय जननीमपि जन्मभूमिम् ।
सन्त्यज्य, गच्छति विदेशमभीष्टलोकं
चिन्ताकुलीकृतमति: पुरुषोऽत्र लोके ।। २६ ।। लोभाविष्टचक्रधरकथा पंचतंत्र - अपरीक्षितकारकम् : "एखाद्या चिन्तेने व्याकुळ झालेला मनुष्य या जगामध्ये सत्याचा त्याग करतो, नातेवाईकांना सोडून देतो. जननी आणि जन्मभूमीला तावडतोब सोडून, आवडत्या ठिकाणाचा त्याग करून विदेशी निघून जातो." म्हणजे या व्यक्तीमध्ये जी इच्छित गोष्ट मिळवण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची वृत्ती आहे, तीच वृत्ती या प्रेमी जीवांची असते. मार्ग

कितीही अवघड असो, त्यातून वाट काढण्याची हुशारी प्रेम माणसाला शिकविते. अतिस्नेह: खलु कार्यदर्शी । = खरे प्रेम माणसाला काही ना काही मार्ग दाखवितेच. [विक्रमो अंक २] बुध्दिमान नसलेली व्यक्तीसुध्दा या प्रेमाच्या जोरावर आपल्या कार्यात यश मिळवते. कोणत्याही प्रेमामध्ये मग ते प्रेमिकांचे असो वा मित्रांचे असो ही हुशारी माणसामध्ये येते. हीच गोष्ट हे प्रेमाचे तत्त्वज्ञान कालिदास पुढील श्लोकातून व्यक्त करतो -

> न बुध्दिगुणेनैव सुहृदामर्थदर्शनम् ।
> कार्यसिध्दिपथ: सूक्ष्म: स्नेहेनाप्युपलभ्यते ।।

आपल्या मित्रावरील नितान्त प्रेमामुळेच केवळ [मालविका. ४/६] धारिणी राणीच्या अत्यंत कडक बंदोबस्तातून मालविकेची सुटका करून दोन प्रेमिकांचे मीलन घडवून आणणा-या विदूषकाला उद्देशून अग्निमित्रांने उच्चारलेला हा श्लोक प्रेमाचे सामर्थ्यच व्यक्त करणारा आहे. या मध्ये नायक म्हणतो - मित्रांच्या हेतूंचे ज्ञान केवळ बुध्दिसामर्थ्यानेच होते असे नाही, तर कार्यात यश मिळविण्याचा सूक्ष्म मार्ग प्रेमाने देखील उपलब्ध होतो. हे प्रेम माणसाला चतुराई कशी शिकविते याचे आणखी एक उदा. म्हणजे उर्वशीवरील आपले प्रेम लपविण्यासाठी पुरुरवा औशीनरी राणीवर अधिकच प्रीति दाखवितो. यामुळे दु:खी झालेल्या उर्वशीची समजूत काढतांना तिची मैत्रीण चित्रलेखा तिला म्हणते - "अयि मुग्धे अन्यसंक्रान्तप्रेमाणो नागरा भार्यायामधिकं दक्षिणा भवन्ति" म्हणजे अग वेडे, दुस-या प्रेयसींच्यावर मन जडलेल्या चतुर व्यक्ति [पहिल्या] पत्नीच्या बाबतीत अधिक उदार होतात. "सत्यं परित्यजति" याचे हे उदा. लक्षांत ठेवण्यासारखे आहे.

खरे प्रेम हे कोणताही दोष जाणत नाही. "ममत्र भावैकरसं मन:स्थितं न कामवृत्तिर्वचनीयमीक्षते ।" म्हणजे "माझे मन या ठिकाणी निश्चित बसले आहे, आणि प्रेमिजन कोणताही दोष बघू शकत नाही." ही प्रेमावरील निष्ठा कालिदासाने कुमारसंभवात व्यक्त केली आहे. प्रेम आंधळे असते हेच येथे कालिदासाला दाखवावयाचे आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

" स्नेहप्रवृत्तिरेवंदर्शिनी । [अभि. शां. ४/ ]
प्रेमाचा महिमाच असा आहे.

अशा रीतीने कालिदासाचे जवळ जवळ सर्वच ग्रंथ हे प्रेमाधिष्ठित असून प्रेमाचे तत्त्वज्ञान प्रतिपादित करणारे आहेत. त्याच्या नाटकातील किंवा काव्यातील पात्रे ही नुसतेच प्रेम करीत नाहीत तर प्रेम जगतात. प्रेमाचे तत्त्वज्ञान जगतात. कालिदासाला अपेक्षित प्रेम हे भोगमूलक नाही तर ते त्यागमूलक आहे. सीता, शकुंतला आणि पार्वती यांचे प्रेम असेच त्यागाधिष्ठित असल्यामुळेच आदर्श आहे. उलट इरावती वा उर्वशीचे पहिल्या ३ अंकापर्यंतचे प्रेम हे भोगमूलक असल्यामुळेच ते दु:खदायक आहे. शकुंतलेचे सुरवातीचे प्रेम, पार्वतीचे पहिले सौंदर्याधिष्ठित प्रेम हे भोगाधिष्ठित असल्यामुळेच क्लेशकारक ठरले. अनेक संकटांना तोंड दिल्यानंतर यांना प्रेमाचे खरे तत्त्वज्ञान कळले. याबाबतीत प्रा. र. पं. कंगले आपल्या "कालिदासाची नाटके" या ग्रंथात लिहितात - "बाह्य रूपाने उत्पन्न होणारे प्रेम वैषयिक आणि हलक्या दर्जाचे होते. संकटाच्या भट्टीवर भाजून ते प्रेम बाहेर पडते तेव्हाच त्याचा स्वार्थीपणा नष्ट होऊन ते कर्तव्यांत परिणत होते. अशा उदात्त आणि निरपेक्ष प्रेमाची समाजाच्या धारणा आणि अभ्युदयासाठी अत्यन्त आवश्यकता आहे. म्हणून कालिदासाने आपल्या दुसऱ्या ग्रंथामध्येही अशा प्रकारच्या प्रेमाची चित्रे रेखाटली आहेत. कुमारसंभवात - पार्वती, मेघदूतात - यक्षपत्नी, विक्रमोर्वशीयम् मध्ये औशीनरी राणी या अशाच प्रेमाच्या मूर्ती आहेत. तसेच शकुंतला, सीता, धारिणी यांही पतिव्रता म्हणून गणल्या जातात त्याचे कारण म्हणजे त्यांचे त्यागाधिष्ठित प्रेम हेच होय.

याबाबतीत डॉ. वा. वि. मिराशी यांचेही विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. कुमारसंभवातील मदनदाहाबाबत आपले विचार व्यक्त करतांना ते म्हणतात की 'मूळ वाल्मीकि रामायणांतील [बाल. स. २३] शंकर- पार्वतीच्या विवाहानंतर शंकर तपश्चर्येला बसला असतांना त्याने केलेला "मदनदाह" याठिकाणी शंकर पार्वतीच्या विवाहापूर्वी कालिदासाने दाखविला आहे." हा बदल त्याने करण्याचे कारण म्हणजे कालिदासाला असे सांगावयाचे आहे की -"केवळ बाह्य-

रुपावर अवलंबून असणारे प्रेम टिकाऊ नसते, जे अनेक आपत्तींत व हालअपेष्टांत अविचल राहते तेच खरे प्रेम होय". [कुमार पा. नं. ११३]

कालिदासाने प्रियकर- प्रेयसी वा पती- पत्नी यांच्या प्रेमाच्या विविध छटा आपल्या ग्रंथात रंगविलेल्या आहेत. निरागस, निष्पाप प्रेम करणारी शकुंतला, मदनदाहाच्या प्रसंगाने स्वत:च्या सौंदर्याचा अभिमान गळून पडलेली व तपश्चर्येने शंकराचे प्रेम मिळवू पाहणारी मानी पार्वती, बेहोष आणि धुंद प्रेम करणारी उर्वशी, पतिव्रता सीता, विरहिणी यक्षपत्नी, प्रेमभंगाचे अतीव दु:खं पचवूनही पतीचेच सुख इच्छिणा-या पतिव्रता धारिणी आणि औशीनरी आणि याच प्रेमभावनेच्या सुडभावनेमुळे पेटलेली इरावती या कालिदासीय सर्वच नायिकांची व्यक्तिचित्रे हृदयस्पर्शी आहेत. आपल्या व्यक्तिमत्वांनी या सर्वच स्त्रिया वाचकांची मने जिंकून घेतात.

रघुवंशातील अज विलापातून पती- पत्नींच्या अतूट प्रेमाची महती कवीनी गायली आहे, तर नकळत घडलेल्या चुकीमुळे पश्चात्तापाच्या अग्नीत होरपळलेल्या प्रेमाची कथा दुष्यन्ताच्या चित्रणातून कवीने व्यक्त केली आहे. उर्वशीच्या प्रेमाने वेडया झालेल्या पुरूरवाद्वारे उत्कट प्रेमाची कथा तर मेघदूतातील यक्षाच्या द्वारा शृंगारलोलुप तरीही पत्नीवर नितान्त प्रेम करणा-या विरही जीवाचे चित्रण कालिदासाने केले आहे. वासनामय प्रेम हे माणसाच्या नाशास कारणीभूत होते. हा संदेशही अग्निवर्णाच्या द्वारा कवीने सर्वांना दिला आहे. अशा रीतीने आपल्या ग्रंथातील विविध पात्रांच्या द्वारा कालिदासाने प्रेमाच्या विविध रंगांची उधळण केली आहे. म्हणून प्रेमाचे हे विविध रंग पाहिल्यावर "प्रेमा तुझा रंग कसा ?" ही उक्ती सार्थ वाटते.

कालिदासाची विचारपध्दती उथळ नव्हती तर ती सखोल होती. त्यामुळे कोणत्याही गोष्टीच्या लांबी किंवा रुंदीपेक्षा तो त्याच्या खोलीचा अधिक अभ्यास करीत असावा असे त्याच्या ग्रंथातील उक्तींचा विचार करतांना आपल्याला वाटते. आणि त्यामुळे आपल्या अनुभवाचे ज्यात सारसर्वस्व साठविले आहे अशी वचने अर्थांतरन्यासरुपाने कालिदास देतांना दिसतो. ही

BARR. B... ...KAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

वचने सार्वकालिक आणि त्रिकालाबाधित सत्ये आहेत. प्रत्येक गोष्टीतून तत्त्व शोधून काढण्याच्या त्याच्या या वृत्तीमुळेच त्याला "तत्त्वज्ञ" म्हणणे जास्त योग्य ठरेल.

पूर्वीच आपण विचार केल्याप्रमाणे प्रियकर आणि प्रेयसी किंवा पती आणि पत्नी यांच्या प्रेमाला आपण "प्रेम" या नावाने संबोधितो. नात्यानुसार हे प्रेम वेगवेगळ्या नावांनी व अर्थांनी ओळखले जाते. हेच प्रेम पण ते मातापित्यांचे आपल्या मुलांवर असेल तर त्याला आपण "वात्सल्य" म्हणतो. देशावर जडलेल्या प्रेमाला "देशभक्ति" म्हणतो. देवावरील प्रेमाला नुसती "भक्ति" वा "श्रध्दा" म्हणतो, सहवासामुळे उत्पन्न झालेल्या प्रेमाला जिव्हाळा म्हणतो. थोडक्यांत हेच प्रेम विविध रुपांनी आपल्या समोर येते. म्हणूनच मनुष्य हा प्रेमावरच जगत असतो. या प्रेमाचे साम्राज्यच सर्वत्र पसरले आहे.

याच पिता- पुत्रीच्या वात्सल्याने ओथंबलेल्या चौथ्या अंकामुळे "शाकुंतल" जगात लोकप्रिय झाले आणि सर्व नाटकांच्या उच्च स्थानी जाऊन बसले. या अंकात कण्वमुनींनी आपल्या मायेच्या सावलींत वाढवलेल्या शकुंतलेची पाठवणी करतांना त्यांच्या मनाची झालेली अवस्था, जिवाची झालेली घालमेल कालिदासांनी चित्रित केली आहे. ही अवस्था फक्त कण्वमुनींच्यापुरतीच मर्यादीत नाही तर कन्येची सासरी पाठवणी करणा-या प्रत्येक माता- पित्याची आहे, आणि त्यामुळे ती सार्वकालिक आहे. सृष्टीच्या उत्पत्तीपासून अंतापर्यंत ती तशीच राहणार आहे. सुख दु:ख मिश्रित अशी ही भावना मातापित्यांची तसेच कन्येचीही होत असते. माता-पित्यांची ही भावना होण्याचे कारण स्वत:च्या काळजाचा तुकडा आपल्याला कायमचा दुरावणार म्हणून दु:ख, पण सुख अशासाठी की "अर्थो हि कन्या परकीय एव" [अभि. शां. अं. ४] म्हणजे "कन्या हे परक्याचेच धन होय" याची जाणीव लहानपणापासून माता- पित्यांना असल्यामुळे ज्यांचे धन त्यांना दिल्याचे समाधान व एका जबाबदारीतून मोकळे झाल्याचा आनंद त्यांना होतो. म्हणून सुख. कन्येला दु:ख होते ते आपल्या आईवडीलांच्यासह सर्व प्रेमाच्या माणसांना आपण दुरावणार म्हणून व सुख स्वढयासाठीच की आपल्याला जन्माचा

साथीदार मिळणार म्हणून. ही प्रत्येक सासरी जाणा-या कन्येची मन:स्थितीही कालिदासाने शकुन्तलेच्या द्वारा व्यक्त केली आहे. ती म्हणते -"हला प्रियंवदे, नन्वार्यपुत्रदर्शनोत्सुकाया अप्याश्रमपदं परित्यजन्त्या दुःखेन मे चरणौ पुरत: प्रवर्तेते ।" म्हणजे "गडे प्रियंवदे, आर्यपुत्रांची कधी भेट होईल असं मला झालं असलं तरी आश्रम सोडून जातांना माझी पावलं मोठ्या कष्टानं पुढे पडत आहेत." मानवी मनाचा असणारा कालिदासाचा सूक्ष्म अभ्यास आणि प्रत्येकाच्या अंतरंगात शिरून त्याची व्यथा व्यक्त करण्याची त्याची ही हृदयस्पर्शी पध्दती हीच त्याच्या "तत्त्वज्ञ" वृत्तीची निदर्शक आहे.

शाकुन्तलाच्या याच अंकात प्रेमाच्या इतरही छटा आपल्याला पहावयास मिळतात. त्यामध्ये प्रियंवदा आणि अनसूया यांचे आपल्या मैत्रिणीवर असणारे [शकुंतलेवर] प्रेम, त्यामुळे तिच्या होणा-या कायमच्या वियोगामुळे त्यांना यापुढे शून्यवत् वाटणारा आश्रम, होणारे अतीव दुःख यांचेही हृदयस्पर्शी वर्णन कालिदासाने केले आहे. आणि याहीपेक्षा उत्कट प्रेमाचे दर्शन कालिदासाने घडवले आहे ते मानवेतर प्राण्यांनी शकुंतलेवर केलेल्या प्रेमामध्ये. शकुंतला सासरी जात असल्यामुळे होणा-या दुःखात कण्व मुनी, तिच्या मैत्रिणी आणि इतर आश्रमवासी या तर सहभागी आहेतच, पण त्याचबरोबर इतर मानवेतर सृष्टीलाही तिच्या जाण्याचे अपार दुःख झालेले आहे. आणि हे दुःख आपल्या वेगवेगळ्या कृतींच्या द्वारा ही सृष्टी व्यक्त करते. याठिकाणी कवी दाखवितो -

> उद्गलितदर्भकवला मृग्य: परित्यक्तनर्तना मयूरा: ।
> अपसृतपाण्डुपत्रा मुञ्चन्त्यश्रूणीव लता: ।। अभि. शा. ४/१२

हरिणांनी दर्भाचे घास खाली टाकून दिले आहेत, मोरांनी नृत्य थांबवलं आहे, आणि पांढुरकी पानं खाली टाकणा-या वेली जणू कांही आसवं ढाळीत आहेत. या श्लोकांतून पशु, पक्षी, प्राणी वा निसर्ग यांचे मानवांवर असणारे निर्व्याज प्रेमच आपल्याला दिसून येते. प्रेम ही भावना फक्त मानवामध्येच नाही तर संपूर्ण विश्वांत ती भरून राहिली आहे. आणि हे मानवेतर सृष्टीचे मानवांवर असणारे प्रेम हे मानवापेक्षाही अधिक इमानदार असते याची अनेक उदाहरणे

इतिहासामध्ये आपल्याला वाचावयास मिळतात. उदा. शिवाजी महाराजांच्या "वाघ्या" कुत्र्याचे आपल्या धन्यावर असणारे आणि राणा प्रतापच्या "चेतक" घोड्याचे आपल्या मालकांवर असणारे प्रेम. या इमानदार प्राण्यांनी आपल्या धन्यांवरील अत्यंतिक प्रेमाखातर स्वत:चे प्राण अर्पण केल्याचेही इतिहास आपल्याला सांगतो. याच प्रेमाचे दर्शन आपल्याला वरील श्लोकातून कालिदासाने घडवली आहे.

हे अत्यंतिक प्रेम माणसाच्या मनांत नको त्या शंका आणते. "अतिस्नेह: पापशङ्की" [अभि. शां. ४] अशीही मानवी मनातील भीति कालिदासाने या अंकात बोलून दाखविली आहे. या भीतिपोटीच शकुंतलेच्या मैत्रिणी तिला सावधानतेचा इशारा देतात.

अशा रीतीने हे प्रेम जसे माणसाला समर्थ बनवते, धाडसी बनवते तसे ते माणसाला हळवेही बनवते. आपल्या आवडत्या व्यक्तीच्या बाबतीत मनुष्य हळवा होतो तो या प्रेमामुळेच.

पितापुत्रीच्या या प्रेमाचे दर्शन शाकुंतलाच्या चवथ्या अंकात ज्याप्रमाणे आपल्याला घडते त्याचप्रमाणे या अपत्यस्नेहाचे दर्शन घडवणारे अनेक श्लोक कालिदासाच्या ग्रंथात आपल्याला दिसून येतात. खरे पाहतां कण्व मुनी हे कांही शकुंतलेचे जनक नव्हेत तर फक्त पालक आहेत, तरीही त्यांना शकुंतलेच्या पाठवणीचे इतके दु:ख होत आहे. मग प्रत्यक्ष जन्मदात्या पित्याला किती बरे दु:ख होत असेल असे कण्वमुनी या अंकात म्हणतात. ते म्हणतात -

> वैक्लव्यं मम तावदीदृशमिदं स्नेहादरण्योकस: ।
> पीडयन्ते गृहिण: कथं नु तनयाविश्लेषदु:खैर्नवै: ।।

अभि. शां. ४/६ - माझ्यासारख्या आरण्यवासी माणसाला ममतेमुळे इतके विलक्षण दु:ख होत आहे. मग पूर्वी कधी न अनुभवलेल्या कन्येच्या विरहाच्या वेदनांमुळे गृहस्थाश्रमी माणसांना किती दु:ख होत असेल ?

कण्वमुनींच्या प्रमाणेच असा प्रश्न "विक्रमोर्वशीयम्" नाटकांत पुरुरवाला पाहिल्यावर छोटया तापसकुमाराला पडला आहे. तो तेथे म्हणतो कीं -

यदि हार्दमिदं श्रुत्वा पिता ममायं सुतोऽहमस्येति ।
उत्सङ्गवर्धितानां गुरुषु भवेत् कीदृशः स्नेहः ।।

"विक्रमो. अंक ५/१० हे माझे पिता आणि मी यांचा पुत्र हे ऐकताच जर इतका स्नेह वाटतो, तर मांडीवर वाढवलेल्या मुलांना किती स्नेह वाटत असेल ?

म्हणजे प्रेम ही भावना अशी आहे की जी सहवासाने उत्पन्न होते. काहीवेळा बघतां क्षणीच पहिल्या नजरेत एखाद्या व्यक्तीचे दुस-यांवर प्रेम बसते, तर कांहीवेळा नात्याचा उमज पडताच प्रेम उत्पन्न होते. अशा रीतीने या प्रेमाचा महिमा अगम्य आहे. असेच कालिदासाला या श्लोकांमधून सुचवायचे आहे.

प्रेमाचे सर्वात उदात्त दर्शन होते ते मातापित्यांच्या आपल्या अपत्यावरील प्रेमामधून. कारण हे प्रेम पूर्णतः निःस्वार्थी तर असतेच, पण आपल्या अपत्याच्या प्रेमाखातर जगातले कोणतेही दुःख, मग कितीही ते दुःसह असो, सोसण्याची ताकद मातापित्यांमध्ये असते. या आपल्या अपत्याची प्रत्येक कृती, त्याचे हसणे, चालणे, बोलणे त्याचा पराक्रम या सर्व गोष्टी मातापित्यांच्या आनंदात भर टाकणा-या असतात. अपत्यस्नेहाविषयीचे हे तत्त्वज्ञान आपल्याला सर्वत्र दिसून येते. कालिदासाच्या ग्रंथात या संदर्भात आलेले श्लोक पुढीलप्रमाणे -

प्रमोदबाष्पाकुललोचना सा
न तं ददर्श क्षणमग्रतोऽपि ।
परिस्पृशन्ती करकुड्मलाभ्यां
सुखान्तरं प्राप किमप्यपूर्वम् ।। कुमार - ११/१८

"कुमाराला पाहिल्यानंतर पार्वतीच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. त्यामुळे समोर असून सुध्दां ती त्याला पाहूं शकली नाही. पण त्याला हातांनी

कुरवाळताना तिला एका अपूर्व प्रेमाची प्रचीति आली" अपत्य प्रेमाचे एक अपूर्व दर्शन कालिदास या श्लोकांत आपल्याला घडवतो.

पुत्रस्पर्शाच्या आनंदाच्या बाबतीत इतर ग्रंथातही असे उल्लेख आपल्याला सापडतात उदा.

एवं च भाषते लोकश्चन्दनं किल शीतलम् ।

पुत्रगात्रस्य संस्पर्शश्चन्दनादतिरिच्यते ।। पंचतंत्र - अपरिक्षितकारकम् ब्राह्मणी नकुल कथा. "लोक असे म्हणतात की, चन्दन हे सर्वात अधिक थंड होय. पण मुलाच्या अवयवाचा स्पर्श हा चन्दनापेक्षाही जास्त थंडगार असतो."

याच अर्थाचा आणखीही एक श्लोक "विक्रमोर्वशीयम्" नाटकांत आपल्याला पहावयास मिळतो. छोटया तापसकुमाराला पाहिल्यानंतर आणि तो उर्वशीचा म्हणजे आपलाच पुत्र आहे हे समजल्यानंतर राजाला झालेला आनंद पुढील श्लोकांतून आपल्याला दिसून येतो. आणि अपत्यस्नेहासाठी आसुसलेल्या पित्याच्या मनाचे दर्शन याठिकाणी आपल्याला होते. या श्लोकांत कालिदास वर्णितो -

सर्वाङ्गीण: स्पर्श: सुतस्य किल तेन मामुपगतेन ।

अल्हादयस्व तावच्चन्द्रकरश्चन्द्रकान्तमिव ।।

विक्रमो. - ५/११ - पुत्राचा स्पर्श सर्वांगाला सुखकारक वाटतो. [असे म्हणतात] तेव्हा चन्द्रकिरणांनी चन्द्रकान्त मण्याला ज्याप्रमाणे त्याप्रमाणे तू माझ्याजवळ येऊन मला आनंद दे.

आपल्या पुत्राच्या बाळलीला पाहतांना मातापित्यांना वाटणा-या कौतुकाचे दर्शन करावयासही कालिदास विसरलेला नाही. कुमार संभव या आपल्या महाकाव्यामध्ये कुमार कार्तिकेयाच्या बाळलीला पाहतांना त्याच्या मातापित्यांना म्हणजे शंकर- पार्वतीला झालेल्या आनंदाचे वर्णन करतांना या अपत्यस्नेहाबद्दलचा एक सर्वसामान्य सिध्दान्तही तो सांगून टाकतो. कारण

कोणत्याही गोष्टीतून सर्वसामान्य निष्कर्ष काढणे हे तर कालिदासाचे वैशिष्टय आहे. म्हणून तर आपण त्याला "तत्त्वज्ञ" म्हणतो. येथे कालिदास म्हणतो.

मुदे न हृद्या किमु बालकेलि: ।। कुमार ११/४०

म्हणजे "रमणीय बाललीला कोणास अल्हाददायक होणार नाहीत ?" या बाल कार्तिकेयांनी पार्वती- परमेश्वराची हृदये आकर्षिली

लहान मूल, मग ते आपले असो वा परक्याचे, एवढेच काय ते शत्रूचे जरी असले तरीही त्याच्याविषयी पाहणा-याला प्रेम वाटते. अपत्यप्रेमाची ही भावना फक्त मानवामध्येच नाही तर मानवेतर प्राण्यामध्ये सुध्दा आपल्याला दिसून येते. मांजरी आपल्या पिलांना चाटते, गाय आपल्या वासरांना दूध देते, एवढेच काय पण वाघासारखे क्रूर प्राणी सुध्दां डोळ्यांत तेल घालून आपल्या पिलांचे रक्षण करतांना आपल्याला दिसून येतात. ह्या मायेच्या उबेसाठी प्रत्येक जीव तळमळत असतो. प्रत्यक्ष देवाधिदेव विष्णूंना सुध्दा या सुखापासून वंचित राहिल्यामुळे "भिकारी" म्हणून घ्यावे लागले.

स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी.

म्हणजे संपूर्ण जगाचा अधिपति असून सुध्दा आईच्या प्रेमाशिवाय त्याचे हे स्वामित्त्व फुकट होय असेच कवीला याठिकाणी म्हणावयाचे आहे. मातृप्रेमाचा हा महिमा जगात सर्वत्र गायिलेला आपल्याला दिसून येतो.

तेव्हा आपल्या पुत्राची प्रत्येक कृती ज्या आईला आनंदित करते, त्या आईला आपल्या मुलाचा पराक्रम [त्याचा उत्कर्ष] पाहून किती बरे आनंद होत असेल ? हाच विचार कालिदासाने पुढील श्लोकांत व्यक्त केला आहे.

सुतविक्रमे सति न नन्दति का खलु वीरसूः ।।

कुमार १२/५९ "आपल्या पुत्राच्या पराक्रमदर्शनाची वेळ आली असतां कोणत्या वीरमातेला [आनंदाचे] भरते येणार नाही". कुमार कार्तिकेयाचा रणोत्साह पाहून पार्वतीला झालेल्या आनंदाचे वर्णन या श्लोकांत केले आहे.

" पुत्रोत्सवे माद्यति को न हर्षात् । [कुमार. ११/१७]

अशा रीतिने या पुत्रस्नेहाचे दर्शनही कालिदासाने आपल्या ग्रंथातून रसिकांना घडविले आहे.

याप्रमाणे "मालविकाग्निमित्रम्" नाटकांत विदूषकाने राजा अग्निमित्राच्या प्रेमसाफल्यासाठी व बकुलावलिकेने मालविकेच्या प्रेमसाफल्यासाठी केलेल्या प्रयत्नावरून तसेच चित्रलेखा, प्रियंवदा, अनसूया यांच्या आपल्या मैत्रिणीसाठी केलेल्या प्रयत्नावरून मित्रप्रेमाचे महत्त्वही कालिदासाने स्पष्ट केलेले आहे.

प्रेमाची ही विविध रूपे पाहतां प्रेमाशिवाय मनुष्य जगूंच शकणार नाही असे वाटते. प्रेमाचे हे तत्त्वज्ञान, प्रेमाचे हे महात्म्य ओळखूनच कालिदासाने या प्रेमाची विविध रूपे, या प्रेमातून उत्पन्न होणा-या भिन्न भिन्न प्रतिक्रिया यांचे हृदयस्पर्शी दर्शन त्याच्या ग्रंथातून घडविले आहे. एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या पात्रांच्या द्वारा, वेगवेगळ्या पध्दतीने प्रेमाचे तत्त्वज्ञानच त्याने आपल्यासमोर मांडले आहे. म्हणूनच प्रेमाचे हे तत्त्व जाणणारा म्हणून "तत्त्वज्ञ" हे विशेषण त्याच्या बाबतीत सार्थ ठरते.